## एकूण १२ स्थानके • पहिल्या टप्प्यात आठ स्थानकांचा समावेश

# मेट्रो ३ जुलैपर्यंत धावणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो-३ लवकरच प्रवाशांच्या सेवेत येणार असून, मेट्रो ३ कॉरिडोरचा पहिला टप्पा १ जून किंवा जुलैपर्यंत धावणार असल्याची माहिती एमएमआरसीएलकडून देण्यात आली. या मार्गावर आरे ते बीकेसीदरम्यान आठ स्थानके असतील, तर धारावीला वरळीशी जोडणाऱ्या दुसऱ्या टप्पयात तीन आणि वरळी ते कफ परेड या तिसऱ्या टप्प्यात १२ स्थानके असणार आहेत.

गेल्या कित्येक वर्षांपासून भूमिगत मेट्रोची असलेली प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. कारण मेट्रो-३ चा पहिला टप्पा प्रवाशांसाठी सुरू होण्यासाठी सज्ज आहे. या मार्गावरील टनलिंगचे काम सहा वर्षांपूर्वी सुरू झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, सध्या शॉर्ट स्ट्रेचवर ट्रेन चालवण्याची तयारी सुरू आहे. रुळांची स्थितीच्या मूल्यांकन



करण्यासाठी सुरुवातीला सिद्धिविनायक किंवा दादर स्थानकापर्यंत ट्रेने चालवण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.चे म्हणणे आहे की, या मार्गावर ट्रायल रनची योजना आखण्यासाठी ही सुरुवातीची रन अनिवार्य आहे. आतापर्यंत दादर स्थानकापर्यंत ओव्हरहेड विद्युतीकरण (ओएचई) आणि ट्रॅक पसरवण्याचे प्रमुख कार्य पूर्ण झाले आहे.

## सुरक्षा प्रमाणपत्र, मंजुरी घेणे आवश्यक

■ एमएमआरसीएलने प्रवाशांच्या भाराची माहिती गोळा करण्यासाठी बीकेसी आणि आरेदरम्यान भंगार भरलेल्या पिशव्याची चाचणी आधीच सुरू केली आहे. व्यावसायिक कामकाज सुरू करण्यापूर्वी, प्राधिकरणाने नियुक्त प्राधिकरणांकडून सुरक्षा प्रमाणपत्रे आणि मंजुरी घेणे आवश्यक आहे.

## मेट्रोचे तीन टप्पे

■ मुंबई मेट्रो प्राधिकरणाने कफ परेड-बीकेसी-सीप्झ कॉरिडोरला तीन टप्प्यात सुरू करण्याची योजना आखली आहे. सीप्झला बीकेसीशी जोडण्याचा पहिला टप्पा लवकरच सुरू केला जाणार आहे, ज्याला वरळीपर्यंत विस्तारित केले जाईल. हे काम दुसऱ्या टप्प्यात समील आहे. अंतिम तिसरा टप्पा कफ परेडपर्यंत असेल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.